# मनपा कर्मचाऱ्यांसाठी लवकरच सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवाणी

## कर्मचारी कल्याण समितीच्या बैठकीतील निर्णय

नांदेड दि. १४ : नांदेड महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी आता सांस्कृतीक कार्यक्रम, कलागुणांना वाव देणारे उपक्रम तसेच विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात येणार आहेत. कर्मचारी कल्याण समितीच्या आज बुधवारी (दि. १४) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

समितीची बैठक उपआयुक्त (प्रशासन) शशीमोहन नंदा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात कर्मचारी कल्याण समितीच्या मासिक वर्गणीत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यास आता ५ ऐवजी २५, लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यास १० ऐवजी ५० तर लिपीकापेक्षा वरच्या पदावरील कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या वेतनातून २० ऐवजी ७५ रुपये अशी रक्कम दरमहा कपात होणार आहे. कल्याण निधीत आजअखेर २ लाख ९० हजार रुपये जमा असुन यातील १ लाख ८० हजार रुपयांचे वितरण करण्यास समितीने आज मंजूरी दिली. या रक्कमेतून मयत झालेल्या ४ कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १० हजार तर ह्रदयविकार / कर्करोग पिडीत कर्मचारी किंवा त्यांच्या पाल्यास प्रत्येकी १० हजार रुपये अनुदान देण्याची चार प्रकरणे मंजूर करण्यात आली. याशिवाय ४ कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये कर्जरुपात देण्याचा निर्णय समितीच्या बैठकीत घेण्यात आला. समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज सहा टक्यावरुन आठ टक्यापर्यत वाढविण्याचा निर्णय सर्वानुमते झाला. या बैठकीस नगरसचिव पी. पी. बंकलवाड, शिक्षणाधिकारी भागवत जोशी, विलास गजभारे, गणेश शिंगे, विलास थोरात आदी उपस्थित होते.